# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 124/2023 दिनांक : 25.03.2023

## 1)खुनाचा प्रयत्न :–

**1)वजिराबाद :–**दिनांक 23.03.2023 रोजी 17.30 वा. चे सुमारास, **पाण्याचे टाकीजवळ खडकपुरा नांदेड येथे**, यातील फिर्यादी दुल्लेशहा रहेमाननगर येथील मस्जीदमध्ये नमाज अदा करून जात असतांना खडकपुरा पाण्याचे टाकीजवळ आरोपीने फिर्यादीस दरमहा 25,000/–रू खंडणी न दिल्याचे कारणावरून व त्याचे विरूध्दचे दाखल पोस्को गुन्हयामध्ये जबाब दिल्याचे कारणावरून मनामध्ये राग धरून गैरकायदयाची मंडळी जमवुन, कट कारस्थान रचुन फिर्यादीवर पाळत ठेवुन फिर्यादीवर हल्ला करून खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी शेख शमीम पि. शेख इसाख, वय 37 वर्षे, व्यवसाय नायब मुतवली दर्गा हजरतशहा महेमान व मस्जीद खडकपुरा नांदेड** यांचे फिर्यादीवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरन **87/2023 कलम** 143, 147, 148, 149, 307, 387, 120(ब), भादवि सह कलम 4/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री मंठाळे, मो. नं. 8237703777** हे करीत आहेत.

## 2)घरफोडी :–

**1)नांदेड ग्रामीण :–**दिनांक 21.03.2023 रोजी चे 20.00 ते दि. 22.03.2023 चे 05.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहाते घरी जिजामाता कॉलनी सिडको नांदेड येथे**, यातील अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घराचे कुलूप तोडुन घरात प्रवेश करून नगदी 10,000/–रूपये व सोन्या चांदीचे दागीने असा एकुण 48,000/–रू ऐवज चोरून नेला. वगैरे **फिर्यादी संतोष जिवनराव देशमुख, वय 34 वर्षे, व्यवसाय शेती रा. जिजामाता कॉलनी सिडको नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 199/2023 कलम 457, 380, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2442 नलबे, मो.क्रं. 9823232815** हे करीत आहेत.

**2)किनवट :–**दिनांक 23.03.2023 रोजी चे 09.00 ते 11.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहाते घरी आदिवासी कॉलनी गोकुंदा ता. किनवट जि. नांदेड येथे**, यातील अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घराचे समोरील दरवाजाचे कुलूप तोडुन दरवाजा उघडुन आत मध्ये प्रवेश करून घरातील कपाटात ठेवलेले सोन्याचे गंठण 24 ग्रॅम किंमती 50,000/–रूपयाचे व सोन्याची पोत काळया मन्यात ओवलेली अर्धा तोळे किंमती 22,000/–रूपये असे एकुण किंमती 72,000/–रूपयाचा ऐवज कोणीतरी अज्ञात आरोपीतांनी चोरून नेला. वगैरे **फिर्यादी उमाताई अरविंद आत्राम, वय 40 वर्षे, व्यवसाय शिक्षीका रा. आदिवासी कॉलनी गोकुंदा ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे किनवट** गुरन 77/2023 कलम 454, 380, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री मामीडवार मो.क्रं. 9850061133** हे करीत आहेत.

**3)धर्माबाद :–**दिनांक 24.03.2023 रोजी चे 01.30 ते 05.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहाते घरी समराळा ता. धर्माबाद जि. नांदेड येथे**, यातील अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घराचा दरवाजा कशाने तरी काढुन आत प्रवेश करून घरामध्ये लोखंडी पेटीत ठेवलेले नगदी 30,000/–रूपये व बॅग मधील नगदी 2,000/–रूपये व तीन मोबाईल असे एकुण 41,000/–रूपयाचा माल कोणीतरी अज्ञात आरोपीतांनी चोरून नेला. वगैरे **फिर्यादी साहेबराव दत्ता धुळेकर, वय 32 वर्षे, व्यवसाय शेती व मजुरी रा. समराळा ता. धर्माबाद जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरन 57/2023 कलम 457, 380, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2177 मुंडले मो.क्रं. 9823021772** हे करीत आहेत.

## 3)मोबाईल चोरी :–

**माळाकोळी :–**दिनांक 24.03.2023 रोजी चे 18.30 वा. चे सुमारास, **माळाकोळी येथील सार्वजनिक रोडवर ता. लोहा जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादी हा गावातील आठवडी बाजार भरल्याने वीरभद्र स्वामी यांच्या दुकानासमोर रोडवर भाजीपाला घेत असतांना यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून पाठीमागे येऊन फिर्यादीच्या वरच्या शर्टच्या खिशातील त्याचा रिअलमी कंपणीचा किंमती 13,300/–रूपयाचा मोबाईल चोरून नेत असतांना फिर्यादीने आरडा ओरड केल्याने बाजारातील लोकांनी पकडले. वगैरे **फिर्यादी भीमराव बालाजी पवार, वय 39 वर्षे, व्यवसाय टेलर रा. माळाकोळी ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे माळाकोळी** गुरनं 36/2023 कलम 379, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोहेकॉ/2308 राठोड, मो.क्र. 02466– 246233** हे करीत आहेत.

## 4)विवाहीतेचा छळ :-

**1)नांदेड ग्रामीण :-** दिनांक 10.02.2022 ते दि. 05.05.2022 आज पावेतो, **फिर्यादीचे सासरी नवीन वसाहत जवाहरनगर नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुझे माहेरहुन वॉटर सर्विसींग सेंटर टाकण्यासाठी 3,00,000/-रूपये घेवुन ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून उपाशी पोटी ठेवुन फिर्यादीचा शारिरीक व मानसिंक छळ करून घरातुन हाकलुन दिले. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 22 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 197/2023 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1238 मुपडे, मो.क्रं. 9923388510** हे करीत आहेत.

**2)सिंदखेड :-** लग्नानंतर दोन ते तीन महिण्यापासुन **ते** दिनांक 04.02.2023 दरम्यान, **फिर्यादीचे घरी गोपी किशन मंगल कार्यालयाचे बाजुला गोकुंदा ता. किनवट व माहेरी सायफळ ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुझे माहेरहुन चार चाकी वाहन घेण्यासाठी दहा लाख रूपये घेवुन ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून फर्यादीचा शारिरीक व मानसिंक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 29 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सिंदखेड** गुरनं 16/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2356 चौहाण, मो.क्रं. 7499005925** हे करीत आहेत.

## 5)गंभीर दुखापत :-

**1)देगलुर :-** दिनांक 23.03.2023 रोजी चे 20.00 वा. चे सुमारास, **हनुमान मंदीराजवळील मारोती मिठाईघर समोर देगलुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन कोर्टात केस चालु आहे ती उचलुन घे असे म्हणुन फिर्यादीस तोंडावर बुक्का मारून फिर्यादीचा दात पाडला. साक्षीदार भांडण सोडवण्यास आला असता त्याला लाकडाने मारल्याने त्याचे उजवे हाताचे बोटाला मार लागुन जखमी केले. वगैरे **फिर्यादी विठ्ठल सायन्ना भंडरवार, वय 49 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. चमकुमडी ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 134/2023 कलम 325, 324, 323, 143, 147, 149, 504, 506 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री रेडेकर, मो.क्रं. 9821159844** हे करीत आहेत.

## 6)बनावट नोटा :-

**माहुर :-** दिनांक 23.03.2023 रोजी चे 22.00 वा. चे सुमारास, **बौध्दविहार परिसर माहुर ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे बौध्द विहार परिसर साफसफाई करीत असतांना भारतीय चलनाचे 500/-रूपये दराच्या एकुण 174 नोटा एकुण किंमती 87,000/-रू भारतीय चलनासारखे बनावट चलनी नोटा चलनात आणण्याच्या उद्देशाने तयार करून माहुर येथील बौध्द विहार परिसरातील अज्ञात इसमाने फेकुन दिल्या होत्या त्या पोस्टेला आणुन गुन्हा दाखल करण्यात आला. वगैरे **फिर्यादी आकाश रमेश कांबळे, वय 30 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. बौध्दभुमी परिसर वार्ड क्रं 3 माहुर ता. माहुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे माहुर** गुरन 31/2023 कलम 489, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री संजय पवार, मो.नं. 9823290456** हे करीत आहेत.

## 7)निष्काळजीपणाणे मृत्यु :-

**1)शिवाजीनगर :-** दिनांक 15.03.2023 रोजी चे 09.30 वा. चे सुमारास, **महात्माफुले मंगल कार्यालय फुले मार्केट शिवाजीनगर नांदेड येथे,** यातील **मयत नामे बालाजी रामा खंडागळे, वय 40 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. गौतमनगर सांगवी नांदेड** हा नांदेड महानगरपालिका यांच्या महात्मा फुले मंगल कार्यालय फुले मार्केट शिवाजीनगर येथील जागेवरील चालु बांधकामाच्या ठिकाणी पाजव्या मजल्यावरून पहिल्या मजल्यावर येणाऱ्या मोकळी जागा डक हे सुरक्षित करण्याची जबाबदारी असतांना बांधकाम कॉन्ट्रॅक्टर रामानी पटेल यांनी तेथे कोणत्याही प्रकारचे सुरक्षेकरीता सुरक्षा जाळी न लावता त्यांचे सरक्षेमध्ये हयगय व निष्काळजीपणा व बेजाबाबदारपणाचे कृत्य केल्याने यातील मयताचा मृत्यु झाला. त्याचे मरणास यातील नमुद आरोपी हा कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री उमाकांत वैजनाथ पुणे, वय 39 वर्षे, व्यवसाय नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं. 92/2023 कलम 304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री माने, मो.क्र. 9403546846** हे करीत आहेत.

## 8)प्राण्यास क्रुरतेने वागणुक :–

**1)अर्धापुर :–**दिनांक 23.03.2023 रोजी चे 20.00 वा. चे सुमारास, **गिरगाव चौक मालेगाव ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने आपले ताब्यातील वाहन महिंद्रा बोलेरो पिकअप क्रमांक एमएच–20/इजी–8893 मध्ये चार बैल जातीचे जनावरांना निर्दयतेने कोंबुन क्रुरपणे इजा होईल अशा पध्दतीने बिना परवाना बेकायदेशिररीत्या कतली साठी वाहतुक करीत असतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहकॉ/बाबुराव ज्ञानोबा चाटे, ने. पोस्टे अर्धापुर** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरन 85/2023 कलम 11(1)(ड)(ई) प्राणि संरक्षण कायदा सह कलम 5(अ), 9, 11 महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1279 पप्पु चव्हाण, मो. नं. 9356283717** हे करीत आहेत.

## 9)भारतीय हत्यार कायदा :–

**लोहा :–**दिनांक 24.03.2023 रोजी 08.35 वा. चे सुमारास, **आरोपीचे घरी मौ. आडगाव ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात लोखंडी तलवार बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/284, नारायण किशनराव कदम, ने. पोस्टे लोहा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 04/2023 कलम भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/श्री किरपणे, मो.क्र. 9881708474** हे करीत आहेत.

## 10)जुगार :–

**1)कुंडलवाडी :–** दिनांक 24.03.2023 रोजी चे 15.55 वा. चे सुमारास, **दत्ता हरी बाजीराव हिंगणे यांचे शेतात खोपीचे समोर मौ. गुजरी जि. नांदेड येथे,** यातील नमुद नऊ आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशीररीत्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 2130/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/183, संजय लिंगुराम च्यापलवार, ने. पोस्टे कुंडलवाडी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंडलवाडी** गुरनं 33/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1921 कदम, मो.क्रं. 8007753455** हे करीत आहेत.

## 11)प्रोव्हिबीशन :–

**1)उमरी :–** दिनांक 24.03.2023 रोजी 17.00 वा. चे सुमारास, **रामखडक शिवार साई तंदुरी धाबा मध्ये ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 1680/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री रवींद्र राजेंद्र करे, ने. पोस्टे उमरी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 70/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/बोडके, मो.नं. 9923104527** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड